शिवजयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी व दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ >>पान 2

छत्रपती संभाजी महाराजांचा युवकांनी आदर्श घ्यावा : आ. सिद्धार्थ खरात >>पान 3

जनतेची दिशाभूल करुन शासकीय निधीवर अधिकारी, ठेकेदाराचा डल्ला? >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

**सुविचार**

आत्मविश्वासानेच आपली क्षमता आणि कौशल्यांची ओळख होते.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



शिवजयंतीनिमित्त छावा 'संभा'चा शिवरायांना रायगडावर मुजरा, हात जोडत भावुकपणे म्हणाला...

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 190 ■ गुरूवार, दि. 20 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राज्य शासनाच्यावतीने किल्ले संवर्धनाचे काम सातत्याने सुरु : मुख्यमंत्री

## किल्ले शिवनेरी येथे शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित किल्ले हे आमच्याकरीता मंदिरापेक्षाही मोठे असून त्यांचे जतन आणि संवर्धनाचे काम राज्य शासनाच्यावतीने सातत्याने सुरु आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार,आमदार शरद सोनवणे, बापूसाहेब पठारे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य आशाताई बुचके, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.**



शिवजन्मोत्सवाच्यानिमित्त नागरिकांना शुभेच्छा देवून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे योद्धे असण्यासोबतच उत्तम प्रशासक होते. विविध व्यवस्थापनाचे गुरु होते, शिवरायांनी आपले संपूर्ण आयुष्य जनतेच्या कामी लावले म्हणून आदर्श राजा,जाणता राजा, श्रीमंत योगी म्हणून आपण त्यांचे स्मरण करतो.

स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड येथे विविध विकास कामे सुरु आहेत. त्याचप्रमाणे शिवनेरीचाही विकास करण्यात येत आहे. छत्रपती शिवरायांच्या किल्लयांवरील अतिक्रमण काढण्याचा निर्णय घेण्यात आला असून कसल्याही प्रकारची अतिक्रमणे राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.



देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्यातील १२ गड किल्ले नामांकनासाठी निवडले आहेत. हे गडकिल्ले स्थापत्यशास्त्र, जलसंवर्धन, पर्यावरणशास्त्राचे उत्तम नमुना असून याबाबत पॅरिस येथील होणाऱ्या महासभेत येत्या आठवड्यात सादरीकरण करण्यात येणार आहे. हे गड किल्ले जागतिक वारसास्थळे होतील आणि जगातील लोक ते बघण्याकरीता येतील, अशा विश्र्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुगल साम्राज्यात विविध राजे, राजवाडे मांडलिकत्व पत्कारत असताना मराठी मुलखात अनाचार, अत्याचार सुरु होते. माँ. जिजाऊनी छत्रपती शिवाजी महाराजांना याविरुद्ध प्रतिकार करुन स्वराज्याकडे नेण्याची जबाबदारी दिली. छत्रपती महाराजांनी अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र करुन मावळ्यांची फौज तयार केली, यामाध्यमातून देव, देश आणि धर्माची लढाई सुरु करुन स्वराज्य स्थापनेतून खऱ्याअर्थाने भारताचा आत्मभिमान जागृत केला. आजच्या १४० कोटी लोकसंख्येच्या आत्मभिमानी भारताच्या मागे छत्रपती शिवरायांची प्रेरणा असून ते आमचे आराध्य दैवत आहेत.

येत्या ५ वर्षांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा ४०० वा शिवजन्मोत्सव साजरा करणार आहोत. किल्ले शिवनेरीवर आल्यानंतर >>पान २

## छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असलेले सुराज्य निर्माण करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध : उपमुख्यमंत्री शिंदे

छत्रपती शिवाजी महाराजांचा 'सर्वसमावेशक कारभार' डोळ्यासमोर ठेवून काम करण्यात येत असून त्यांना अभिप्रेत असलेले सुराज्य निर्माण करण्यासाठी राज्यशासन कटीबद्ध आहे, लोकल्याणकारी राज्य निर्मितीकरीता यापुढेही प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



छत्रपती शिवाजी महाराजांचे गड किल्ले त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाचे साक्षीदार असून त्यांनी यामध्ये प्राण फुंकले आहे. हे गड किल्ले अभियांत्रिकी, स्थापत्य शास्त्राचा एक उत्तम नमुना आहे. याठिकाणी आल्यावर आपल्याला एक वेगळ्याप्रकारची ऊर्जा, प्रेरणा मिळते. म्हणून या गड किल्लयाची देश विदेशातही लोकप्रियता आहे. त्यामुळे गड किल्ले, जुन्या मंदिरांचे जतन आणि संवर्धनाची कामे करण्यात येत आहे.गड किल्यांवर येणाऱ्या पर्यटकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन एक सर्किट तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे श्री. शिंदे म्हणाले.

शिवरायांनी स्वराज्याची निर्मिती करताना पर्यावरणाचे रक्षण केले. छत्रपती शिवरायांची आरमारी ताकत नौदलाकरीता प्रेरणादायी आहे. नौदलाच्या ध्वजावर शिवप्रतीमेला समाविष्ट केले ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.

## किल्ल्याच्या संवर्धनासाठी निधी कमी पडून देणार नाही : उपमुख्यमंत्री पवार

छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकोट, किल्ले खऱ्याअर्थाने त्यांची दौलत आहे, ते आपले शक्तीस्थान, स्फूर्तीस्थान असून त्यांचे जतन, संवर्धन करणे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे राज्यशासनाच्यावतीने किल्ले शिवनेरी, रायगड, प्रतापगड, सिंहगड, पुरंदर आदी किल्ले परिसरात विविध विकासकामे करीत आहेत, किल्लयाच्या संवर्धनासाठी निधी कमी पडून देणार नाही, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.



छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित प्रसंग, त्यांनी घेतलेले प्रत्येक निर्णय स्वराज्याचे हित, जनतेचे कल्याण डोळ्यासमोर ठेऊन दूरदृष्टीने निर्णय घेतलेला होता. सामाजिक एकोपा, न्याय, सुशासन आणि लोकल्याणाची शिकवण दिली. त्यामुळे आजच्या शिवजयंतीच्यानिमित्ताने छत्रपती शिवरायांच्या विचारावर निष्ठा ठेवून काम करण्याचा संकल्प करुया, महाराष्ट्राला आणखी महान राष्ट्र करण्यासाठी एकजुटीने, एकदिलाने काम करुया, शिवरायांची शिकवण आणि त्यांच्या विचारांचा वसा पुढे नेताना महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सर्वांनी योगदान द्यावे, हीच खरी शिवजयंतीची प्रचिती ठरेल, असे श्री. पवार म्हणाले.

## संदीप नाईकांच्या घरवापसीच्या हालचालींना वेग, पुन्हा भाजपमध्ये प्रवेश करणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकांनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या मोर्चेबांधणीला सुरुवात झालीय. विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजप सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले संदीप नाईक पुन्हा भाजपमध्ये जाणार असल्याच्या चर्चांना वेग आला आहे. विधानसभा निवडणुकीत त्यांनी महाविकास आघाडीच्या तिकिटावर बेलापूर मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. मात्र, त्यांना पराभव पत्करावा लागला. आता पुन्हा भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, मंगळवारी रात्री संदीप नाईक समर्थक माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. बंडखोरी करणाऱ्या संदीप नाईक समर्थक नगरसेवकांना मुंबईत भाजपात प्रवेश देण्यात आला. मुंबईत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा प्रवेश पार पडला. वनमंत्री गणेश नाईक आणि माजी खासदार संजीव नाईक यांच्या नेतृत्वात हा प्रवेश झाला. मात्र, भाजपच्या काही जुन्या कार्यकर्त्यांनी या नगरसेवकांना पक्षात घेण्यास विरोध दर्शवला होता. आगामी महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपने या नगरसेवकांना पुन्हा पक्षात घेतल्याचे बोलले जात आहे.

# बुलढाण्यात ३९५ वी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी


## छत्रपती शिवाजी महाराजांना जयंतीदिनी अभिवादन

---

## पदयात्रा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि रक्तदान शिबिरात शिवप्रेमींचा सहभाग

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे आराध्य दैवत, स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५वी जयंती बुलढाणा शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



या निमित्त जिल्हा प्रशासन आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरातील जिजामाता प्रेक्षागृह (स्टेडियम) परिसरात शिवजयंती उत्सव सोहळ्यात 'जय शिवाजी, जय भारत' पदयात्रा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि रक्तदान शिबिरासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, माजी आमदार विजयराज शिंदे, अपर जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, समितीचे अध्यक्ष राजेंद्र काळे, बुलढाण्यातील नागरिक, विद्यार्थी व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

या शिवजयंती उत्सवात जिल्हा प्रशासनाच्यावतीने 'जय शिवाजी, जय भारत' पदयात्राही काढण्यात आली. या पदयात्रेदरम्यान आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्यासह मान्यवरांनी संगम चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करुन अभिवादन केले. तसेच जयस्तंभ चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, रमाई आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास फुलपुष्प अर्पण करुन अभिवादन केले. या पदयात्रेत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी हिरीरिने सहभागी झाले होते.


शिवजयंती उत्सव कार्यक्रमात राजमाता जिजाऊ यांना वंदन करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिश पुतळ्याचे पूजन करुन मानवंदना देण्यात आली. तसेच भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले यासह व्यसन मुक्ती शपथ, बेटी बचाओ, बेटी पढाओची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात विविध कलाकारांनी नृत्य, पोवाडे आदी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले व आयोजकांच्या वतीने पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

जिल्हाधिकाऱ्यांनी केले रक्तदान

शिवजयंती निमित्त आयोजित रक्तदान शिबिरात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी रक्तदान करुन सहभाग नोंदवला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांचेसह प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान करुन शिबिरात योगदान दिले.

# धरणातून इतर गावांना पाणी देण्यासाठी विरोध; मादणी ग्रामपंचायतीने घेतला ठराव

## डोणगावची पाणी टंचाई भीषण रूप धारण करण्याची शक्यता



संग्रहीत छायाचित्र

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी : मादणी येथील धरणावरून इतर कोणत्याही गावांना पाणीपुरवठा करण्यात येऊ नये, असा ठराव मादणी ग्रामपंचायतने ७ फेब्रुवारी रोजी घेतल्याने जिल्ह्यातील सर्वांत मोठी ग्रामपंचायत असणाऱ्या डोणगावमध्ये पाणीटंचाई भीषण रूप धारण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.डोणगाव येथे सध्या पाणीटंचाई निर्माण झाली आहे. राष्ट्रीय पेयजल योजनेतून गावाला पाणी मिळाले नाही. तर, जलजीवन मिशन योजनेच्या मादणी धरणावरून गावाला पाणी पुरवठा करण्याबाबत विरोध केला जात असल्याने डोणगाववासीयांना पाणी टंचाईचे चटके बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

डोणगावच्या जलजीवन मिशनच्या नळ योजनेसाठी पेनटाकळी धरणावरून पाणी घेण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत. डोणगावची लोकसंख्या ४० हजार जवळपास आहे. येथील जलजीवन मिशन ची कामे २०५५ च्या लोकसंख्येच्या गृहितकावर करण्यात आली आहे. दूरदृष्टी न ठेवता फक्त ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसार मादणी धरणावरून पाणी घेतल्यास पूर्वीच्या राष्ट्रीय पेयजल योजनेप्रमाणे जलजीवन मिशनदेखील अयशस्वी होईल. गावाला पाणी मिळणार नाही, असे ग्रामस्थांना वाटत आहे. त्यामुळे विरोध अधिक तीव्र झाला आहे. तर पाणीटंचाईवर मात करण्यासाठी दीर्घकालीन योजना राबवण्याची गरज निर्माण झाली आहे.

## डोणगाववर पाणी टंचाईचे संकट गडद

जलजीवन मिशनतंर्गत प्रत्येकाला ५५ लीटर शुद्ध आणि शाश्वत पाणी देण्याचा उद्देश आहे. डोणगावसारख्या मोठ्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या जवळपास ४० हजार आहे. पेनटाकळीसारख्या मोठ्या धरणावरून पाणी मिळाल्यास या महत्त्वाकांक्षी योजनेला गती मिळू शकते. पाणीपुरवठ्याची योजना योग्य ठिकाणी आणि वेळेवर अमलात आणली गेली, तर प्रत्येक घरात शुद्ध पाणी मिळवणे शक्य होईल. मादणी धरणावरून डोणगावच्या नळ योजनेसाठी पाणी घेण्यासाठी ठेकेदार आणि अधिकाऱ्यांनी सर्व प्रकारचे नियोजन केले होते. मात्र, मादणी धरणाचा तळ मार्च महिन्यापासून गाठला जातो. या काळात शेतीला पाणी आवश्यक आहे. त्यामुळे, कोणत्याही नळ योजनेसाठी पाणी देण्यास विरोध करण्यात आला. त्याबाबत ग्रामसभेने ठराव केला आहे. डोणगाव येथील पाणी पाणी टंचाईचे संकट अधिक गडद झाले आहे.

## सकारात्मक विचार करुन परीक्षा द्या!

फेब्रुवारी–मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वि आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा नुकत्याच पार पडल्या. दहावीची बोर्ड परीक्षा उद्यापासून म्हणजे २१ फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १७ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही ११ फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी – बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळेवर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणे टाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे. पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वतः ही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्र्चित मिळेल. दहावी बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही त्यामुळे टेन्शन फ्री राहा. मन शांत ठेवून प्रश्र्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा! ऑल दि बेस्ट.....!!

# शिवजयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी व दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** येथून जवळच असलेल्या बेलगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय येथे छत्रपती शिवजयंती निमित्ताने १९ फेब्रुवारी रोजी जिल्हास्तरीय महात्मा गांधी आचार विचार संस्कार परीक्षेमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक कुटे होते. तर, प्रमुख अतिथी म्हणून मधुकर कांबळे हे होते. सर्वप्रथम छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी जिल्हास्तरीय गांधी फाउंडेशन द्वारा आयोजित स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विद्यालयातील वर्ग १० ची विद्यार्थिनी पल्लवी संजाबराव देशमुख हिने गोल्ड मेडल मिळविल्याबद्दल मुख्याध्यापक दीपक कुटे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. द्वितीय क्रमांक वर्ग ९ ची विद्यार्थिनी मरियमबी शेख हबीब हिने सिल्वर मेडल मिळविले तर तृतीय क्रमांक विद्यालयातील कलाशिक्षक सचिन रहाटे यांनी ब्रांझ मेडल मिळवले. या सर्व गुणवंताचा सत्कार विद्यालयामध्ये मुख्याध्यापक दीपक कुटे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विद्यालयाला गांधी



फाउंडेशन यांच्यावतीने यशस्वी आयोजनाबद्दल स्मृतिचिन्ह देउन सन्मानित करण्या आले.तसेच त्यानंतर छत्रपती शिवराय यांच्या जीवनावर वर्ग दहावीची विद्यार्थी पल्लवी देशमुख, वर्ग सातवी चा विद्यार्थी धम्मदीप वानखेडे, वर्ग सहाची विद्यार्थिनी ऋतिका वानखेडे यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर वर्ग १० च्या विद्यार्थ्यांना निरोप निरोप देण्यात आला.यामध्ये सुद्धा वर्ग १० च्या विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. सदर विद्यार्थ्यांना गीते, कावरखे यांनी मार्गदर्शन केले. तसेच मुख्याध्यापक दीपक कुटे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षा पद्धती बद्दल तसेच भावी जीवनाबद्दल योग्य मार्गदर्शन करून छत्रपती शिवरायांचे जीवन कौशल्य अभ्यासामध्ये तसेच भावी जीवनामध्ये अवगत करून जीवनामध्ये प्रगती साधावी व यशाचे उंच शिखर गाठावे असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद मेटांगळे यांनी केले.तर, आभार अनिल जायभाये यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे, वानखेडे, गीते, मेटांगळे, जायभाये, खुशालराव मेटांगळे, विजय दाभाडे, मधुकर कांबळे, गजानन देशमुख यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी परिश्रम घेतले.

# कोलवड येथे कृषी ड्रोन प्रात्यक्षिक



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** तालुक्यातील कोलवड येथे कृषी विभाग आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्स यांच्या पुढाकाराने सोमवारी कृषी ड्रोन प्रात्यक्षिक व जनजागृती शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या कार्यक्रमास शेतकरी, विद्यार्थी आणि कृषी व महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. हा उपक्रम जिल्हा कृषी कार्यालय आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास तहसीलदार विठ्ठल कुमरे, कृषी सहाय्यक रवींद्र म्हस्के, कृषी पर्यवेक्षक संदीप आंभोरे, कोलवडचे सरपंच कौतीकराव पाटील, जिजामाता महाविद्यालय प्राचार्य डॉ. सुरेश गवई तसेच प्राध्यापक व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रगतीशिल शेतकरी साहेबराव पाटील, यांनी या ड्रोन प्रात्यक्षिकाचा अनुभव घेतला.

या कृषी ड्रोनच्या प्रात्यक्षिकात औषध फवारणी, पिकांचे आरोग्य परीक्षण आणि अचूक शेती तंत्रज्ञानाचा माहिती देणेयात आली. कृषी यांत्रिकीकरण उप–अभियानांतर्गत शेतकऱ्यांसाठीच्या शासकीय योजना व अनुदानाची माहिती देण्यात आली. आधुनिक शेती तंत्र आणि कृषी तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधून रोजगाराच्या संधींवर चर्चा करण्यात आली. या प्रात्यक्षिकादरम्यान शेतकरी व विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष सहभागासह प्रश्र्नोत्तर सत् घेण्यात आले तसेच ड्रोन शेतीचे फायदे आणि नियमांविषयी माहिती देण्यात आली.

या ड्रोन प्रात्यक्षिकासाठी कृषी विभाग आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल कस्तुरे पुढाकार घेत त्यांच्या कार्यालयातील कोमल शेलके आणि निलेश बाहेकर यांच्या सहकार्य हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# शिवजयंती निमित्त मादणी येथे विविध सामाजिक कार्यक्रम



### रक्तदान शिबिर,आरोग्य शिबिरासह यशवंत युवकांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मादणी येथे शिवप्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर यासह विविध पदावर निवड झालेल्या युवकांचा सत्कार करण्यात आला.विशेष म्हणजे कोणताही गाजावाजा न करता सामाजिक उपक्रम राबवल्याबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

मादणी येथे शिवप्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ढोल ताशे, डीजे न लावता किंवा कोणताही गाजावाजा न करता रक्तदान शिबिर घेण्यात आले. सदर शिबिरात तब्बल १०१ शिवभक्तांनी रक्तदान केले.तसेच यावेळी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात अस्थिरोग तज्ञ डॉक्टर वायाळ यांनी ९० रुग्णांची तपासणी करून औषधोपचार केले. तसेच यावेळी सार्वजनिक वाचनालयाचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे चिरंजीव ऋषी जाधव यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.तसेच यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात पेवर ब्लॉगचे काम करण्याच्या प्रारंभ करण्यात आला. त्याचबरोबर आपल्या परिश्रमाने विविध विभागातील शासकीय पदावर असलेल्या विविध युवकांचा शिवप्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. मादणी येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती एक आगळ्यावेगळ्या प्रकारे उत्साहात साजरी करण्यात आल्याने या कार्यक्रमाचे परिसरात कौतुक केले जात आहे. त्याचबरोबर आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले.तसेच गावातील विविध पदावर नोकरीवर असलेल्या युवकांचा सत्कार करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ही सर्वांच्या स्मरणात राहणारी व एक आगळावेगळा संदेश देणारी ठरली आहे.

पान १ वरून...

### राज्य शासनाच्यावतीने किल्ले संवर्धनाचे काम सातत्याने सुरु : मुख्यमंत्री

येथील मातीतून स्वराज्याची स्फूर्ती, तेज मिळते. यातून प्रेरणा घेऊन राज्याची सेवा करण्याकरीता आम्ही येथे येतो. राज्यशासनामार्फत शिवनेरी परिसरातील विकासकामे पूर्ण करण्यासाठी आम्ही कार्यरत राहू असे श्री. फडणवीस म्हणाले.

आमदार श्री. सोनवणे यांनी आपले विचार व्यक्त केले

प्रारंभी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायिला. राष्ट्रगीत तसेच 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकाने वाजवून सलामी दिली. त्यानंतर पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळच्या लहान विद्यार्थ्यांच्या पथकाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सुंदर पद्धतीने सादर केले.

त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बाल शिवाजी व माँ जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी वाहीली.

यावेळी मुख्यमंत्री यांच्या हस्ते माजी आमदार बाळासाहेब दांगट, डॉ. अमोल डुंबरे, जालिंदर कोरडे आणि राजाभाऊ पायमोडे यांना शिवनेर भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब मुळे यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.

# गण गण गणत बोतेच्या गजरात दुमदुमली वाशिम नगरी


- पंचक्रोशीतील ३५ भजनी मंडळांनी घेतला सहभाग
- श्रींच्या प्रकट दिनानिमित्त वाशिम शहरात भव्य दिव्य पालखी सोहळा

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** शहरात श्री संत गजानन महाराजांच्या प्रगटदिनानिमित्त प्रकटदिनाच्या आधल्या दिवशी वाशिम शहरातुन प्रभात फेरी मार्गे पालखी सोहळ्याचे आयोजन जुनी आय डी.पी. येथिल श्री संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने करण्यात आले होते. या पालखी सोहळ्याची जुनी आय. डी.पी. येथिल श्री संत गजानन महाराज मंदिरापासुन सुरुवात करुन वाशिम शहरातुन श्रींची पालखी प्रभात फेरी मार्गे मार्गक्रमन करीत गण गण गणात बोते गजरात वाशिम शहरातुन निघाली.या पालखी



सोहळ्याचे अनेक ठिकाणी रांगोळी काढुन तर कुठे श्रींच्या पालखी सोहळ्याचे पुजन करुन स्वागत करण्यात आले पालखी सोहळ्यात पंचक्रोशितील तब्बल पस्तीस भजनी मंडळांनी सहभाग घेतला होता त्यामध्ये जगतगुरु संत तुकोबाराय वारकरी भजनी मंडळ भटउमरा, पुडलिक बाबा महीला भजनी मंडळ जांबरुन परांडे या भजनी मंडळासह इतरही भजनी मंडळांनी सहभाग घेतला होता.यावेळी श्रींच्या पालखी समोर नाचनार्या सजलेल्या अश्र्वानी सर्वाचे लक्ष वेधले.श्रींच्या १४७ व्या



**या पालखी सोहळ्यात मोठ्या प्रमाणात महिलांचा केसरी रंगाची साडी परिधान करून डोक्यावर कळस घेऊन श्रींच्या पालखी सोहळ्यात सहभाग पाहायला मिळाला.**

प्रकट दिनानिमित्त वाशिम शहरात विविध ठिकाणी महाप्रसादाचे २० फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### नांदेड केसरी कुस्ती दंगलीला सुरुवात, चार राज्यातील कुस्ती पैलवान नांदेड मध्ये दाखल



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** आज शिवजयंतीनिमित्त नांदेड केसरी कुस्ती दंगलीला सुरुवात झाली असून लहान कुस्त्या पासून मोठ्या कुस्त्यांपर्यंत ही दंगल होणार आहे या दंगली साठी जवळपास अडीचशे ते तीनशे पैलवान आले असून पंजाब हरियाणा दिल्ली आणि महाराष्ट्र सह दाखल झाले आहे प्रथम पारितोषिक ५१ हजार व दोन किलो चांदीचा गधा देण्यात येणार आहे तर संपूर्ण पारितोषिक हे सात लाख रुपयांची असेल यावेळी आयोजकामार्फत परराज्यातून आलेल्या सर्व स्पर्धकांची व्यवस्था देखील करण्यात आली आहे ह्या कुस्त्या दंगली पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती आयोजकांनी शिवजयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा देखील दिले आहेत.

### शिवरायांचा जयजयकार सातासमुद्रापार, जय भवानी जय शिवाजीच्या जयघोषाने अमेरिका दुमदुमली



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** अमेरिकेतील न्यूयॉर्क शहर जय भवानी जय शिवाजीच्या घोषणांनी दुमदुमून गेला. सांगली जिल्ह्यातील कोकरूड (ता. शिराळा) येथील डॉ. युनूस अत्तार यांच्यासह महाराष्ट्रातील तरुणांनी मोठ्या उत्साहात शिवजयंतीचा उत्सव साजरा केला. स्वराज्य एंटरप्राइजेस, छत्रपती फाउंडेशन, भारतीय वाणिज्य दूतावास आणि अल्बानी ढोल ताशा समूह यांनी संयुक्तपणे शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील अनेक तरुण उपस्थित होते. न्यूयॉर्क येथील स्वराज्य एंटरप्राईजेस चे सी ई ओ तसेच फौंडर कोकरूड (ता. शिराळा) येथील डॉ. युनूस आत्तार, उत्सव प्रमुख स्वप्नील खेडेकर (पुणे), विनोद शिंदे (औरंगाबाद) सुरेश गायकवाड,तडवळे (शिराळा),विजय मानकर यांनी या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी तबला, संगीताचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. शिवजयंती कार्यक्रमाला महाराष्ट्रातील तीनशे ते साडेतीनशे तरुणांसह न्यूयॉर्क, न्यूजर्सी, कनेकटीकट, पेनसिल्वेनिया आणि मेसेचूसेट्स या सभोवतालच्या राज्यातून ही शिवभक्त उपस्थित होते.

### शिवजयंतीनिमित्त छावा 'संभा'चा शिवरायांना रायगडावर मुजरा, हात जोडत भावुकपणे म्हणाला...

**मुंबई/प्रतिनिधी :** आज १९ फेब्रुवारी २०२५ रोजी, शिवजयंतीच्या निमित्ताने अभिनेता विकी कौशलने रायगड किल्ल्यावर भेट दिली. विकी कौशल सध्या 'छावा' सिनेमामुळे खूप चर्चेत आहे. 'छावा' चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारल्यानंतर, विकीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले आणि त्यांना आदरांजली अर्पण केली. यावेळी विकीने त्याला खूप समाधान वाटत असल्याचे सांगितले. याशिवाय त्याने रायगडावर घोषणाही दिल्या.

विकी कौशल पहिल्यांदाच रायगडावर आल्यामुळे तो भावूक होता. मीडियाशी बोलताना त्याने त्याच्या भावना व्यक्त केल्या. त्याने सांगितले, माझं नशीब, माझं सौभाग्य आहे की, मला किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांचे दर्शन घेता आले. आजचा दिवस माझ्यासाठी सर्व काही आहे, तो छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आहे.

विकी कौशल पुढे म्हणाला, शिवाजी महाराजांचा रोल फक्त छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन साकारण्यामध्येच नव्हता तर संपूर्ण युवांचे जीवन साकारण्यामध्येच आहे. त्यांचे योगदान हे वर्षानुवर्षे आठवणीत राहणारे आहे आणि राहिलेच पाहिजे. ते देशाचे पहिले रयतेचे राजा होते. रयतेसाठी लढले, त्यांच्यासाठीच जगले. त्यांच्यापासून आजपर्यंत आपल्याला प्रेरणा मिळते. आपण म्हणतो लोकांचे आणि लोकांसाठी चालणारे सरकार याची सुरुवातच त्यांच्यापासून झाली.

रायगडावर जाऊन विकी कौशलने 'छावा'मधील डायलॉगही बोलले. तो म्हणाला, शेर नही रहां, लेकिन छावा अभी भी जंगल मैं घूम रहा है, हम शोर नहीं करते, सीधा शिकार करते है. विकीने नमः पार्वती पतये, हर-हर महादेव अशी गर्जनाही रायगडावर केली.



# जनतेची दिशाभूल करून शासकीय निधीवर अधिकारी, ठेकेदाराचा डल्ला?

## दोन वर्षानंतरही जल जीवन मिशनचे काम अपूर्ण; अधिकारी म्हणतात जाग्याचा वाद मग अर्धवट काम झाले कसे

भाग १६

## संबंधित पाणीपुरवठा अधिकाऱ्याकडून दिशाभूल करणारी माहिती



मुख्य संपादक : देविदास खनपटे 9767233034

**दोन वर्षानंतरही कऱ्हाडवाडी पाण्याचा प्रश्न कायम; गावकरी त्रस्त, अधिकारी व कंत्राटदार मात्र मस्त**

जल जीवन मिशनचे काम अर्धवट : नागरिकांची पाण्यासाठी भटकंती कायम

भाग ०५

दैनिक आपला विदर्भ

मेहकर.तालुक्यातील कऱ्हाडवाडी येथील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्न कायमस्वरूपी विटावा यासाठी तब्बल ९५ लाख ४२ हजार रुपयांच्या निधीला मान्यता देऊन जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याच्या कामाला दोन वर्षापूर्वी प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, सदर योजनेचे काम अद्यापही पूर्ण न झाल्याने कऱ्हाडवाडीच्या नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम आहे. परिणामी, पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करण्याची वेळ आली आहे.

**अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा ग्रामस्थांच्या मुळावर**

अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे मात्र कऱ्हाडवाडी वासीयांना पाण्या अभावी त्रास सहन करावा लागत आहे. तालुक्यातील कऱ्हाडवाडी येथे सन २०२२ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात येत असलेल्या कामाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने सदर काम पूर्णत्वास गेले नाही,असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अधिकारी पदाधिकारी व कंत्राटदार यांच्या निष्काळजी धोरणामुळे शासनाचा लाखो रुपयांचा निधी मात्र विनाकारण पाण्यात गेल्याचे चित्र दिसून येत आहे.

याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन येथील रखडलेली पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास न्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होते आहे. तालुक्यातील कऱ्हाडवाडी येथे येथील नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा व्हावा, त्यांच्या आरोग्याच्या समस्या दूर व्हाव्या यासाठी तब्बल ९५ लाख ४२ हजार रुपयांच्या निधीला मान्यता देत दोन वर्षापूर्वी जल जीवन मिशनच्या कामाला प्रारंभ करण्यात आला होता.२८ ऑक्टोबर २०२२ रोजी सदर कामास तांत्रिक मान्यता देण्यात आली. तर २४ डिसेंबर २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. बालाजी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स (जितू सावजी) या कंत्राटदार मार्फत सदर काम करण्यास प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, काम सुरू झाल्यानंतर कोठे माशी शिंकली आणि काम बंद पडले हे नागरिकांना व शासकीय अधिकारी पदाधिकाऱ्यांना उमजले नाही. परिणामी, दोन वर्षापासून कऱ्हाडवाडी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात येणारा पाणीपुरवठ्याचे काम अद्यापही पूर्णत्वास गेले नाही. परिणामी ग्रामस्थांना पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे.शुद्ध पाणी देण्याचा केलेला वादा हा हवेत जिरल्याने नागरिकांमध्येही तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. तब्बल ९५ लाखावर निधी खर्च करून करण्यात येत असलेल्या या कामाकडे अधिकारी पदाधिकाऱ्याने दुर्लक्ष केल्याने सदर योजना ही रखडलेलीच आहे.

देविदास खनपटे
मुख्य संपादक

07 Feb 2025 - Page 4 | www.aapalavidarbh.com
Powered by softisky | 9764331134

**मेहकर : तालुक्यातील कऱ्हाळवाडी येथे २०२३ मध्ये तब्बल ९५ लाख ४३ हजार रुपये खर्च करून जल जीवन मिशन कामास ३१ जानेवारी २०२४ रोजी प्रारंभ करण्यात आला.मात्र, वर्षाच्या वर कालावधी होत असतानाही सदर पाईपलाईन पूर्ण झाली नाही. काम अर्धवट असल्याने कराळवाडी येथील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे.उन्हाळ्याच्या दिवसात पाण्यासाठी जीवाची लाहीलाही होणार असून अधिकारी व ठेकेदार यांनी जनतेची दिशाभूल करून शासकीय निधीवर डल्ला मारण्याचे काम केले आहे, असा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन संबंधित कामाची चौकशी करत तत्काळ काम पूर्ण करावे अशी मागणी कऱ्हाळवाडी येथील नागरिकांकडून होत आहे.**



देविदास खनपटे
मुख्य संपादक

तालुक्यातील कऱ्हाळवाडी येथे जल जीवन मिशन अंतर्गत विहीर खोदणे, पंपगृह, पंपिंग मशीन, मुख्य जलवाहिनी, पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था आदी काम करण्यासाठी ९५ लाख ४३ हजार रुपयांचा निधी खर्च करून कामास प्रारंभ करण्यात आला होता. सदर कामाचा कालावधी हा बारा महिन्याचा असताना या कामाला बारा महिन्याच्यावर होत असतानाही अद्याप काम पूर्णत्वास गेले नाही. अधिकारी हे जागेचा वाद दाखवून काम बंद असल्याचे सांगित आहेत.तर, डोणगाव येथील ग्राम विकास अधिकारी हे जागेचा व विहिरीच्या कोणत्याही प्रकारचा वाद नाही असे सांगत आहेत. जलवाहिनी झाली नाही त्यामुळे गावात पाणी आलं नाही अशी माहिती ग्रामविकास अधिकाऱ्यांनी दिली आहे. तर, जलजीवन विषयांचे वरिष्ठ अधिकारी हे जागेचा वाद दाखवून शासनाच्या कोट्यावधी रुपयावर डल्ला मारत असल्याचा प्रकार समोर येत आहे.अधिकारी व ठेकेदार यांच्या मिली भगत वृत्तीमुळे मात्र कऱ्हाळवाडी ग्रामस्थांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे.



आता उन्हाळा लागला असल्याने पाण्याची दाहकता आणखीच वाढणार आहे. त्यामुळे सदर जलवाहिनीचे कामे तत्काळ पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी कराळवाडी येथील ग्रामस्थांकडून होत आहे.

### जागेचा कोणताही वाद नाही : ग्रामविकास अधिकारी

कऱ्हाळवाडी येथे जल जीवन मिशन अंतर्गत करण्यात येणाऱ्या जलवाहिनी विहिरीचे संदर्भात जागेचा कोणताही वाद नाही. पाण्याची वितरण व्यवस्था झाली नाही. एका विहिरीचे खोदकाम करण्यात आले आहे मात्र ती वीर कोरडी केली बाजूच्या शेतकऱ्याच्या विहिरीचे दानपत्र करून दिले आहे. विहीर. आणि पाण्याची टाकी अर्धावट उभी आहे. जलवाहिनी झाली नाही त्यामुळे पाणीपुरवठा झाले नाही. जागेचा कोणताही वाद नाही जलवाहिनी सुरू न झाल्यामुळे ग्रामस्थांना पाणी मिळत नाही.

**–दीपक तांबारे,**
**ग्रामविकास अधिकारी,डोणगाव.**

# यवतमाळ जिल्हा पोलीस दला तर्फे ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत भव्य रोजगार मेळावा

दैनिक आपला विदर्भ

■ **महेबूब शेख**

**उमरखेड :** आपण नेहमी आपल्या जीवनात बघत आलो आहे की पोलीस हा कायदा व सुव्यवस्था राखण्याची तसेच मालमत्तेचे रक्षणाची जबाबदारी राखण्यासाठी व आवश्यक प्रसंगी बळाचा वापर करतो . पोलिसामुळे आपण सुरक्षित आहोत. परंतु त्यांचे जीवन खूपच असुरक्षित आहे. तो त्यांच्या परिवाराचे विचार न करता नागरिक कसे सुरक्षित रहातील यासाठी तत्पर राहतात .त्यामुळे गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी पोलीस गुन्हेगारला सजा देतात. पण यवतमाळ जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी आपल्या जिल्ह्यात गुन्हेगार वाढू नये यासाठी त्यांनी संकल्पनेतून यवतमाळ जिल्हा पोलिस दलातर्फे 'ऑपरेशन प्रस्थान' राबवित आहे. त्यांनी या संकल्पनेतून यवतमाळ जिल्ह्यातील गुन्हेगारीकडे वळणारी तरुणांचे पाऊले रोखण्यासाठी तसेच भरकटलेले व वाममार्गला लागलेले शाळा/कॉलेज सोडलेले तरुणाईला व बेरोजगारांना निःशुल्क विविध व्यावसायिक प्रशिक्षण देऊन प्रत्यक्ष रोजगाराच्या




संधी उपलब्ध करून देण्यसासाठी सुरक्षा रक्षक (Security Guard) सुरक्षा पर्यवेक्षक (Supervisor) पदा करिता ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत यवतमाळ जिल्हा पोलीस दला तर्फे २०/०२/२०२५ रोजी राजस्थानी भवन, महागांव रोड, उमरखेड येथे भव्य रोजगार मेळावा आयोजीत केला आहे .यात सुरक्षा रक्षक या पदासाठी ८ वी ते १२ वी पास किंवा नापास अर्ज करुशकता तर सुरक्षा परिवेक्षक या पदासाठी पदविधर आणि NCC 'C' सर्टिफिकेट वाले अर्ज करण्यासाठी पात्र रहाणार आहे. यासाठी शैक्षणिक प्रमाणपत्र मार्कशीट, आधारकार्ड, मतदान कार्ड, बँक पासबुक (मुळ, झेरॉक्स), पोलीस व्हेरिफीकेशन, पासपोर्ट साईज फोटो (६), घेऊन सकाळी ९ते ५वाजेपर्यंत हजर राहण्याचे अव्हान यवतमाळ जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात आले आहे.

### शिवजयंती निमित्ताने राहुल गांधीचे ट्वीट, भाजपने 'त्या' शब्दावरून घेरले

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने राज्यातच नव्हे तर देशभरात उत्साहाचे वातावरण आहे. रयतेचे राज्य स्थापन करणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध स्तरांतून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात येते. कॉंग्रेसचे नेते, विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनीदेखील शिवजयंती निमित्ताने ट्वीट केले आहे. मात्र, ट्वीटमधील एका शब्दाने भाजपने त्यांना घेरलं आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज सकाळी छत्रपती शिवरायांना अभिवादन करणारे एक ट्वीट केले. या ट्वीटमध्ये त्यांनी शिवजयंतीनिमित्ताने शुभेच्छा देण्याऐवजी श्रद्धांजली अर्पण केली. या एका शब्दावरून भाजपने राहुल गांधींवर टीकेची झोड उठवली आहे.

# सुलतानपूर येथे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

दैनिक आपला विदर्भ

■ **अबुतालीब खान**

**सुलतानपूर:** १९ फेब्रुवारी २०२५ रोज बुधवार ला शाहीन बिछाई केंद्र सुलतानपूर या ठिकाणी सकाळी दहा वाजेच्या दरम्यान मोठ्या थाटामाटाने आनंदाच्या वातावरणात सर्व जाती धर्माच्या मावळ्यांच्या उपस्थिती मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे की १९ फेब्रुवारी बहुजन रयतेचे राजा स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती. यानि मित्ताने शाहीन बिछायत केंद्र सुलतानपूर या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य दिव्य पुतळा ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन विदर्भ कन्या शाहीन पटेल यांनी केले होते. पुतळ्याच्या समोर काही महिलांच्या हस्तेपूजा करून छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती घेण्यात आली तर डॉ. परसराम मामा सुरुशे प्राचार्य गजानन धांडे सर यांच्या हस्ते पूतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष पांडुरंग सुरुशे हे होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार भाई सुरेश मोरे यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पब्लिक मंथन चे संपादक लुकमान कुरेशी, डॉ.अमोल बोराळकर, डॉ. जय देसाई, शिफारस पैलवान, बादल पटेल, मा. मारोतराव धांडे, तंटामुक्ती अध्यक्ष राजेश पिंपरकर, बाळू पटील, सुभास खेत्रे, दुय्यम ठाणेदार वसंत पवार, हेडकॉन्स्टेबल शिवानंद केदार, हेड कॉन्स्टेबल लक्ष्मण कटक, गणेश पत्रकार शेख वसीम भाई, पत्रकार विनोद अंभोरे, पत्रकार उबेद कुरेशी,पत्रकार स्वप्निल अवचार,अंबादास वाघ, संमद पहेलवान, जाकीर पैलवान, दामू कुडके, ओम खोलगडे,संदीप खेत्रे,





मधुकर मुळे, इमरान पैलवान, राजेश मुळे, ऋषिकेश मुळे, शेख मोईन, पत्रकार अबुतालीब खान ,अविनाश कांबळे, अजय पाटोळे, छायाताई कुडके, शांताबाई पाटोळे, चंद्रभागा मुळे, सुनिता कूडके असे अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. ास्ताविक डॉक्टर परसराम मामा सुरुसे यांनी केले अमोल बोराळकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रामध्ये कोण्या एका जाती धर्माच्या विरोधात लढले नाही तर या ठिकाणी असलेल्या सर्व जाती धर्माच्या मावळ्यांना सोबत घेऊनअन्यायी, अत्याचारी आणि जुलमी राज व्यवस्थे विरुद्ध लढा देऊन बहुजनांचे समतावादी स्वराज्य निर्माण केले आणि सर्व जाती धर्माच्या लोकांना समान न्याय दिला. आजच्या युवा पिढींला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची प्रेरणा घेण्याची नितांत गरज आहे. हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा सुंदर असा कार्यक्रम संपन्न केल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती सुलतानपूर यांच्या वतीने हेड कॉन्स्टेबल श्री लक्ष्मण कटक यांच्या हस्ते विदर्भ कन्या शाहीन पटेल यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला.

## विविध वृत्त...

### बुलढाण्यात जय शिवाजी, जय भवानीच्या जयघोषात ढोल ताशांच्या गजरात शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी







**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती आज राज्यासह जगभरात साजरी करण्यात आली. शिवरायाचे आजोळ असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात शिवबाची जयंती मोठ्या धुमधडाक्यात ढोल ताशांच्या गजरात साजरी करण्यात आली आहे. यावेळी मिरवणुकीत आकर्षक सजविलेल्या रथावर राजमाता जिजाऊ आणि बाल शिवाजी यांची वेशभूषा परिधान केलेले बालकलाकार होते. लाठीकाठी, दांडपट्टा यांसारख्या शस्त्रकलेचे प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. या मिरवणुकीमध्ये हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

### शिरपूर जैन येथे सार्वजनिक शिवजयंती उत्साहात साजरी सर्व नगरी शिवमय



**दैनिक आपला विदर्भ**

**शिरपूर जैन/ प्रतिनिधी :** १९ फेब्रु आज हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि शौर्य, न्याय व धर्म यांचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या पराक्रमाने आणि दूरदृष्टीने संपूर्ण देश प्रेरित झाला. त्यांच्या विचारांना वंदन करून अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शिरपूर येथे दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी साजरी करण्यात आली खंडोबा देवस्थान पासून संपूर्ण शहरातून ते ग्रामपंचायत शिरपूर पर्यंत भव्य मिरवणूकिचे आयोजन करण्यात आले सदर ग्रामपंचायत मध्ये शिवप्रेमी साठी खास खिचडी चे आयोजन करण्यात आले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती मा ठाणेदार साहेब शिरपूर यांच्या हस्ते करण्यात आले आणि शिवरायांच्या कार्याला व शौर्याला उजाळा देण्यात आला व यावेळी उपस्थित गावातील सर्व नेते मंडळी व शिरपूर ग्रामस्थ आणि सर्व शिव प्रेमी होते सदर ग्रामपंचायत मधील कार्यक्रम संपल्या नंतर उपस्थिताच्या वतीने सर्वांचे आभार मानले.

### जिल्हाधिकारी कार्यालयाते शिवजयंती साजरी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी (महसूल) समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसिलदार विजय सवडे, यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला फुलपुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्माचारी उपस्थित होते.

# मेहकर नगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवरायांना अभिवादन

## शिवाजी राजांचा राज्यकारभार पारदर्शक होता : आ. सिद्धार्थ खरात

**दैनिक आपला विदर्भ**





**मेहकर/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या गवताच्या काडीची देखील अभिलाषा बाळगू नका,अश्या सक्त सूचना देऊन छत्रपती शिवाजीराजांनी आपल्या राज्यात लाचखोरीला पायबंद घातला. शिवाजी राजांचा राज्यकारभार अत्यंत स्वच्छ आणि पारदर्शक होता. त्यांच्या राज्यात भ्रष्टाचाराला थारा नव्हता, शिवरायांच्या राज्यकारभाराचे केंद्र व राज्य सरकारने अनुकरण करावे असे मत मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले.

नगरपालिकेच्या वतीने शिवाजी उद्यान येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, छत्रपती शिवराय स्वाभिमानासाठी, स्वराज्यसाठी लढले.त्याचप्रमाणे आता आपल्याला शेतकरी ,बेरोजगांच्या प्रश्र्नांसाठी लढावे लागणार असल्याचेही ते म्हणाले. शिवाय१९ फेब्रुवारी लाच छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तारखे नुसारच साजरी करण्यात यावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी रामराजे कापरे,कार्यालय अधीक्षक अजय चैताणे, बांधकाम अभियंता किशोर ढेपले, आरोग्य निरीक्षक संजय गिरी, संगणक अभियंता जैवाळ, अनिता कळसकर, सहायक प्रकल्प अधिकारी रमेश उत्तरे,अनिल मुळे, विशाल शिरपूरकर, प्रकाश सौभाग्य, विलास दाभाडे, विलास जवंजाळ, गजानन कुऱ्हालश रामेश्वर बचाटे,आनंद जमदार, विजू कटारे व नपचे सर्व कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

शिवसेना पक्ष कार्यालयात छत्रपती शिवरायांना अभिवादन

शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष कार्यालय जानेफळ रोड मेहकर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले यावेळी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे लोकप्रिय आमदार सिद्धार्थ खरात, उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, तालुका प्रमुख ॲड.आकाश घोडे, मेहकर शहर अध्यक्ष किशोरभाऊ गारोळे,ॲड संदिप गवई, संदीप गारोळे, परमेश्वर दहातोंडे, अमोल बोरे, श्याम पाटील, गोपाल गायकवाड, रविभाऊ गिरी, योगेश कंकाळ, ऋषिकेश जगताप, सचिन राऊत,स्वप्नील राऊत, शुभम पानखेडे, अमोल मोरे, रोहन जाधव यांची उपस्थिती होती.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती जल्लोषात साजरी

### संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त भव्यदिव्य पालखी सोहळा



**दैनिक आपला विदर्भ**

**■ गजानन जाधव**

**बेलगांव:** तालुक्यातील बेलगाव येथे शिवजयंती निमित्त व श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त ढोल ताशा व टाळ मृदंगाच्या गजरात गावांमध्ये भव्य दिव्य शोभायात्रा काढण्यात आली. त्यानिमित्त सकाळी साडेसात वाजता शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. गावांमधील महापुरुषांच्या प्रतिमेचे सुद्धा पूजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन केले. त्यानंतर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले.नऊ वाजता रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये ४१ शिवभक्तांनी रक्तदान केले व नंतर गावांमध्ये भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. गावामध्ये महिलांनी रांगोळी काढून आपापल्या दारामध्ये पाठ टाकून शिवरायांचे व गजानन महाराजांचे पूजन केले. गावातील नागरिकांनी टाळ मृदंगाच्या ठेक्यावर चांगलाच ताल धरला होता. मृदंग वादक अक्षय महाराज यांनी मृदंगाच्या तालावर युवकांना ताल धरयला लावला. गावांमधून भव्य मिरवणूक काढण्यात आली व त्यानंतर शिवरायांच्या पुतळ्यावर येऊन शिवरायांचे भव्य आरती केली. या मिरवणुकीमध्ये महिला पुरुष बाळ गोपाळ मोठ्या उत्सवाने उपस्थित होते व शिवजयंती निमित्त शिव मित्र प्रेमी व गजानन महाराज सेवा समिती यांच्या वतीने १९ फेब्रुवारी रात्री आठ वाजता कीर्तनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला व २० फेब्रुवारी रोजी सकाळी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. त्यानिमित्त पंचक्रोशीतील भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गजानन महाराज सेवा समिती व शिवप्रेमी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# ई–चावडी प्रणाली वसुलीत मेहकर तालुका राज्यात प्रथम



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारच्या महसूल विभागामार्फत ऑनलाईन ई–चावडी वसुली प्रणाली राबविण्यात येत आहे. या प्रणालीद्वारे महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुका राज्यातून प्रथम आलेला आहे. मेहकर तालुक्यातील १९ फेब्रुवारी रोजी ९०.६० टक्के वसुली केली असून राज्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. सर्वच विभागात आधुनिक यंत्राचा वापर करून कमी वेळेत जास्त व अचूक काम करण्याला प्राधान्य दिले जात आहे त्यानुसारच शासनाच्या वतीने महसूल विभागामार्फत ही चावडी प्रणाली विकसित करण्यात आली आहे.या प्रणाली अंतर्गत शेतकऱ्यांना तलाठी अथवा संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मागे न फिरता घरबसल्या आपला शेतसारा भरण्याची सुविधा केली आहे.त्यानुसार ई चावडी प्रणाली अंतर्गत वसुली करण्याला प्राधान्य दिले जात आहे. ई चावडीने शेतकऱ्यांचा वेळ वाचून त्यांना अचूक माहिती उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर या अगोदर होणारा गैरप्रकारही ही चावडी प्रणालीमुळे रोखण्यात यश आले आहे. ई–चावडी प्रणाली वरील वसुलीत राज्यात मेहकर तालुका प्रथम क्रमांकावर असल्याबाबत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके, नायब तहसीलदार अजय पिंपळकर ,ग्राम महसूल अधिकारी रुपेश जुमळे व तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, तलाठी यांचे कौतुक केले आहे.








**मेहकर : तालुक्यातील अंजनी बुद्रुक अंतर्गत येत असलेली लांडेवाडी येथे जलजीवन मिशन अंतर्गत २२ लाख रुपये खर्च करून पाणीटंचाईवर मात करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, अधिकारी ठेकेदाराच्या या मिलीभगत वृत्तीमुळे सदर कामे दोन वर्षापासून अर्धवट आहे.एकीकडे जल जीवन मिशनचे अधिकारी जागेचा वाद असल्याने कामा अपूर्ण असल्याचे दाखवीत आहेत. तर, दुसरीकडे ग्रामविकास अधिकारी हे जागेचा कोणताही वाद नाही असे सांगत आहेत. याकडे मात्र वरिष्ठ विभागाचे दुर्लक्ष असल्याने लांडेवाडी येथील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे.**

लांडेवाडी येथे तब्बल २२ लाख रुपयांच्या निधी अंतर्गत जलजीवन मिशन अंतर्गत जलवाहिनी पाण्याची टाकी वितरण व्यवस्था अधिक काम करण्यास २० डिसेंबर २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदर काम सहा महिन्यात पूर्ण करणे अपेक्षित होते. मात्र, सदर कामाला दोन वर्षाच्यावर कालावधी होत असतानाही काम अपूर्ण आहे.आतापर्यंत केवळ १६.५९ टक्के काम झाले असल्याचे अधिकाऱ्यांच्या कागदपत्रावरून दिसून येत आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

सदर कामे मे बालाजी बिल्डर डेवलपर्स यांच्या ठेकेदाराकडून काम केले जात आहे. मात्र, सदर काम दोन वर्षापासून अपूर्ण असल्याने लांडेवाडी येथील ग्रामस्थांना पाण्याची समस्या निर्माण झाली आहे.एकीकडे जलजीवन मिशनचे अधिकारी जागेचा वाद दाखवत आहे. तर दुसरीकडे ग्रामविकास अधिकारी हे कोणत्याही प्रकारचा वाद नाही असे सांगत आहेत. त्यामुळे सदर जल जीवन विषयांची योजना ही अधिकारी व ठेकेदारांच्या मिलीभगतमुळे परस्पर हडप केली जाते की काय असा प्रश्र्न निर्माण झाला आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची मागणी लांडेवाडी येथील ग्रामस्थांकडून होत आहे.




> पायघनवाडी व लांडेवाडी येथील जलजीवन मिशनच्या योजनेच्यासाठी कुठल्याही प्रकारची जागेचा वाद नाही, सदर जागेमध्ये दोन्ही गावातील शेतकरी जगाचा दानपत्र करून देण्यास तयार आहेत. त्यामुळे या ठिकाणी जागेच्या वादाचा प्रश्र्न निर्माण होत नाही.
>
> **–एस.पी.शिंगणे,**
> **ग्राम विकास अधिकारी.अंजनी बुद्रुक**